# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

## (सकाळ)

जा.क्र. ९२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
**दिनांक १९/०२/२०१८**

**१) जातीवाचक शिवीगाळ केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिंनाक १७/२/२०१८ चे १३.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही आपले पतीसह डॉ. कावळे भंडारा यांचेकडे तपासणी करीता जात असतांना यातील आरोपीने फिर्यादीस जातीवाचक शिवीगाळ करुन पानउतारा केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३(२)(व्ही)अ.जा.ज.अ.प्र.का अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. डिसले साकोली हे करीत आहेत.

**२)अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन फेसबुकवर पोस्ट केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिंनाक ०२/२/२०१८ चे १०.०८ वाजता दरम्यान यातील फिर्यादी व आरोपी हे फेसबुक युजर्स असुन यांनी फेसबुकवर केलेल्या पोस्टवर फिर्यादीने कमेंन्टस दिले असता यातील आरोपी याने फिर्यादीस कमेंन्टसवर वरुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन पोस्टवर टाकल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २९४,५०१ भादवी. सहकलम ६७ आय. टी. ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सरोदे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**३) फेसबुक व्हॉट्स्अपचे माध्यमातुन बदनामी कारक मॅसेज पाठवुन बदनामी केल्याने गुन्हा नोंद :—**

दिंनाक १७/२/२०१८ चे १३.०३ वाजता दरम्यान यातील आरोपी हा फिर्यादीचा पती असुन तो सोशल मिडीया फेसबुक व्हॉट्स्अपचे माध्यमातुन फिर्यादीची बदनामी व्हावी, म्हणुन फिर्यादीचे नातेवाईक, मैत्रीणी व आई वडीलांना बदनामी कारक मॅसेज पाठवुन बदनामी करतो, असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ६६(सी) (डी) ६७ आय टी ॲक्ट २००० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. चव्हान पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

**४) ट्रकच्या धडकेत एकाचा मृत्यु व ट्रकचे नुकसान झाल्याने गुन्हा नोंद :—**

दिंनाक १८/२/२०१८ चे ०५.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीच्या रोडचे बाजुला उभा असलेला ट्रक क्र. ओ.आर १५ के ४७३१ ला मागेहुन जांबळी सडक शेत शिवार येथे धडक देवुन आरोपीचे ट्रक मधील क्लिनर मृत बाबा अलीम काजी वय २७ वर्ष, रा. कोलकत्ता यांचे मरणास व फिर्यादीचे ट्रकचे नुकसान करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी महेन्द्रसिंग जितसिंग पड्डा वय ५६ वर्ष, रा. चंदन नगर सोमेलेश्वरी कॉलेज केकीचे मागे जिल्हा समलपुर यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३०४(अ) भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. निंबेकर पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**५) एसटी बसला ट्रक ट्रेलरची धडक लागुन १० प्रवासी यांना जखमी करण्यास व एसटी बसचे नुकसान करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद :–**

दिंनाक १८/२/२०१८ चे ०७.०५ वाजता यातील फिर्यादी सुनील अर्जुन वाघ वय ३५ वर्ष, रा. शिवाजी वार्ड साकोली याची एसटी बस क्र. एमएच – ४० वाय ५८२५ ने साकोली वरुन परतवाडा येथे जात असतांना यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक ट्रेलर भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन एसटी बसला मागेहुन फुलमोगरा येथे धडक दिल्याने बसमधील १० प्रवासी यांना जखमी करण्यास व एसटी बसचे नुकसान करुन अपघात करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे लेखी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९,३३७ भादवी. सहकलम १८४,१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**६) अंधारात आपले अस्तित्व लपवुन सोबत हत्यार बाळगुन मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–**

दिंनाक १८/२/२०१८ चे ००.४५ वाजता यातील आरोपी हा अंधारात आपले अस्तित्व लपवित तोंडाला रुमाल बांधुन घरफोडीचे हत्यार बांळगुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. साठवणे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन करडी येथे कलम १२२ मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. साठवणे पोलीस स्टेशन करडी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**७) अचानक प्रकृती बिघडल्याने इसमाचा मृत्यु. :–**

दिंनाक १८/२/२०१८ चे १५.०० वाजता दरम्यान यातील मृतक प्रशांत गोपाल हारगुळे वय ३५ वर्ष, रा. १३ साई नगर वाडी नागपुर यांची अचानक प्रकृती बिघडल्याने त्यास दिनांक १८/०२/२०१८ चे १५.०० वाजता दरम्यान ग्रामीण रुग्नालय लाखनी येथे औषधोपचारा करीता नेले असता डॉ. ने तपासुन मृत घोषीत केल्याने सरतर्फे फिर्यादी मनोहर बगडे वय ४६ वर्ष, कक्ष सेवक ग्रामीण रुग्नालय लाखनी यांचे रिपोर्ट व डॉ. मेमो वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**८) इसमाचा मृत्यु :–**

दिंनाक १७/२/२०१८ चे २२.१५ वाजता दरम्यान यातील मृतक रविंद्र किसन गडकरी वय ५० वर्ष, रा सुभाष वार्ड बेला याची प्रकृती बिघडल्याने त्यास औषधोपचारा करीता आकस्मिक विभाग सामान्य रुग्नालय भंडारा येथे आनले असता डॉक्टरने तपासुन मृत घोषीत केल्याने डॉ. मेमो व मृतकचे पत्नीचे बयाना वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. फुंडे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

९) **अवैध दारु अड्डयांवर धाडी .** :—

दिनांक १८/०२/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, मोहाडी, कारधा, करडी, तुमसर, व सिहोरा येथे अवैध दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण १२ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १०९ लिटर हातभट्टी कि. १०,८००/रु. चा माल जप्त करण्यात आला.

१०) **मोटार वाहन कायदयाखाली कारवाई.** :—

दिनांक १८/०२/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०२ तीन सिटर वाहनाकरीता ०७ ईतर वाहनांवरती — ९९ केसेस करण्यात आले आहे.

**(मपोउपनी. प्रणती लांजेवार)**
**माहिती कक्ष भंडारा**
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.